पुढारी



गडहिंग्लज : रवळनाथ संस्थेत भारती सुतार व कस्तुरी सोनार यांना धनादेश सुपुर्द करताना एम. एल. चौगुले शेजारी प्रा. व्ही. के. मायदेव, डॉ. आर. एस. निळपणकर, प्रा. विजय आरबोळे आदी.

# 'रवळनाथ'तर्फे सभासदाच्या वारसाला २ लाखांची मदत

**गडहिंग्लज : पुढारी वृत्तसेवा**

येथील श्री रवळनाथ को-ऑप. फायनान्स सोसायटी लि., आजरा (मल्टी-स्टेट) प्रधान कार्यालयाकडील सभासद दत्तात्रय रघुनाथ सोनार यांचे निधन झाले. रवळनाथ संस्थेच्या सभासद कल्याण गडहिंग्लज संस्थेचे सभासद निधीतून सोनार यांच्या वारसाला २ लाखांची आर्थिक मदत देण्यात आली.

संस्थाध्यक्ष एम. एल. चौगुले यांच्या हस्ते मयत सभासदाचे वारस मुलगी भारती सुतार व पत्नी कस्तुरी सोनार यांना धनादेश सुपुर्द करण्यात आला. सभासदांच्या हितासाठी संस्थेने सभासद कल्याण निधी उभारला असून यातून नैसर्गिक व अपघाती मृत्यू झालेल्या सभासदांच्या वारसांना आर्थिक मदत देवून त्या कुटुंबाला आधार दिला जातो. यावेळी उपाध्यक्ष प्रा. व्ही. के. मायदेव, संचालक प्राचार्य डॉ. आर. एस. निळपणकर, प्रा. विजय आरबोळे, प्रा. डॉ. दत्ता पाटील, महेश मजती, मीना रिंगणे, उमा तोरगल्ली, रेखा पोतदार, सीईओ डी. के. मायदेव, व्यवस्थापक शिवानंद घुगरे, इराप्पा बडीगेर, सुरेखा बडीगेर आदी उपस्थित होते

My Kolhapur Edition
Mar 13, 2024 Page No. 18
newspaper.pudhari.co.in